दै. पुढारी दि. 10.06.25

# गंभीर गुन्ह्याची अवघ्या दोन तासांत उकल

## सिडको पोलिसांची कामगिरी; दोन लाखांचा ऐवज जप्त

**नांदेड, पुढारी वृत्तसेवा :** शहर व परिसरात चोरी व घरफोडी या सारख्या घटनांनी नागरिकांची झोप उडवली असताना सिडको पोलिसांनी आज धडक कारवाई करत अवघ्या दोन तासांत एका गंभीर गुन्ह्याची उकल करताना दोन लाखांचा ऐवज जप्त केला आहे. या प्रकरणात एकाला अटक केली आहे.

नांदेड शहरातल्या सहा पोलीस ठाण्याच्या हद्दीत चोरींच्या घटनांमध्ये लक्षणीय वाढ झाली आहे. विशेषतः मंगळसूत्र हिसकावणे, वृद्धांना लुटणे या सारख्या घटनांनी डोके वर काढले असून पोलिस ठाण्यातील अधिकाऱ्यांना याबाबत कोणतेही सोयरसूतक दिसून येत नाही. अन्य कामात रुची दाखवणाऱ्या पोलिसांनी चोरींच्या घटनांकडे दुर्लक्ष केल्याने चोरट्यांचे मनोधैर्य दिवसेंदिवस वाढत चालले आहे. सिडको पोलिस ठाण्याच्या हद्दीतील दूध डोअरीसमोर असलेले शेख मौला शेख मोहंमद (वय ४७) हे आपल्या आजारी मुलीला घेऊन संपूर्ण कुटुंबीयांसमवेत अपेक्षा हॉस्पिटलला होते. घराला कुलूप असल्याची संधी साधून अज्ञात चोरट्यांनी त्यांच्या घरातील दागिने व काही रक्कम लंपास केली. हा प्रकार उघडकीस आल्यानंतर त्यांनी सिडको पोलिस ठाणे गाठले. तिथे रीतसर तक्रार दिल्यानंतर पोलिसांनी तपासाची चक्रे वेगाने फिरविली. पोलिस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर, पोलिस उपनिरीक्षक बाबूराव चव्हाण यांनी तांत्रिक बाबी तपासत आपले कौशल्य पणाला लावले. याच भागात असणाऱ्या सय्यद मोहंमद सय्यद इस्माईल (वय ३१) या ताब्यात घेतल्यानंतर त्याने सुरुवातीला उडवाउडवीची उत्तरे दिली. पोलिसी खाक्या दाखविल्यानंतर त्याने गुन्ह्याची कबुली देत चोरलेला तब्बल दोन लाखांचा ऐवज पोलिसांच्या स्वाधीन केला,

सिडको पोलिसांच्या या कामगिरीचे वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांनी कौतुक केले आहे. आरोपीला न्यायालयाने कोठडी सुनावली असून आणखी काही गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

दरम्यान अन्य एका घटनेत सिडको पोलिसांनी दोन विधीसंघर्षग्रस्त बालकांना अटक करून दोन तलवारी व एक खंजर जप्त केले आहे.

दै. प्रजावाणी

# इंस्टाग्रामवर खंजर व तलवारीचे फोटो पोस्ट

## दोन विधी संघर्षित बालकावर गुन्हा

**प्रतिनिधी • नांदेड**

सोशल मीडियावर खंजर तसेच तलवारीने फोटो टाकून दहशत पसरविणाऱ्या दोन विधी संघर्षीत बालका विरुद्ध ग्रामीण पोलीस ठाण्यात भारतीय हत्यार कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दरम्यान समाजात तेढ निर्माण होईल किंवा दहशत केली जाईल अशा पद्धतीने सोशल मीडियावर मजकूर तसेच शस्त्राचे फोटो टाकणाऱ्या विरुद्ध ऑपरेशन फ्लॅश आउट अंतर्गत अनेक कारवाया करण्यात आल्या आहेत.

स्वतःला दादा समजणाऱ्या अनेकांनी पोलिसांसमोर मान वाकवली आहे, असे असताना देखील काही युवकातील फेसबुक, इंस्टाग्रामच्या माध्यमातून भाई बनवण्याची खाज सुटलेली असल्याचे दिसून येत आहे, अशा दोन विधी संघर्षीत बालकांना पोलिसांच्या कारवाईला सामोरे जाण्याची वेळ आल्याने युवकांनी सोशल मीडियाचा वापर कमी आणि चांगल्या कामासाठी करण्याची गरज निर्माण झाली आहे.

तुप्पा येथे एक इसम त्याचे इंस्टाग्राम च्या सोशल मीडियावर अकाउंटवर तलवार व खंजरने फोटो ठेवून दहशत निर्माण करत आहेत, अशी माहिती ग्रामीण पोलिसांना मिळाली. पोलीस निरीक्षक चिंचोलकर यांच्या मार्गदर्शनाखाली डीबीचे पोलीस उपनिरीक्षक बाबुराव चव्हाण व पथकातील कर्मचाऱ्यांनी तुप्पा येथे जाऊन दोन विधी संघर्षीत बालकांना ताब्यात घेतले. त्यांनी फोटोमध्ये बाळगलेले लोखंडी खंजर व तलवार असा एकूण २५०० रुपयाचा ऐवज जप्त केला. विधी संघर्षित बालकाविरुद्ध गुन्हा दाखल केला.